# मुंबई विद्यापीठ
# ई-मासिक वार्तापत्र

मार्च २०२५

वर्ष - ०४ • अंक ०३



## नॅक तृतीय चक्र मूल्यांकनाद्वारे ३.६५ (सीजीपीए) सह अ ++ श्रेणी
## विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा

# मुंबई विद्यापीठात भारतातील पहिली कार्बन डेटिंग कालमापन सुविधा कार्यान्वित

## कार्बन डेटिंगसाठी कालमापन यंत्र बसविणारे मुंबई विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ

## ५० हजार वर्षापूर्वीच्या इतिहासाची अचूक कालगणना होणार

## मुंबई विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा




कार्बन डेटिंग एक्सलरेटर मास स्पेक्ट्रोमेट्री सेंटरच्या उदघाटन प्रसंगी कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, प्रा. एम.एन. वाहिया, प्रा.वर्षा केळकर माने, डॉ. सिद्धार्थ कस्तुरीरंगन आणि डॉ. अभिजीत भोगले




भारतातील पहिले कार्बन डेटिंग एक्सलरेटर मास स्पेक्ट्रोमेट्री सेंटर

मुंबई, दि. २५ मार्चः भारतातील पहिली कार्बन डेटिंग कालमापन सुविधा (एक्सलरेटर मास स्पेक्ट्रोमेट्री, एएमएस) आजपासून मुंबई विद्यापीठात पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होत आहे. सुमारे २० कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या या अद्ययावत सुविधेमुळे मुंबई विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला जात आहे. देशात कार्बन डेटिंगसाठी पहिले एक्सलरेटर सेंटर सुरु करण्याचा बहुमान मुंबई विद्यापीठास मिळाला आहे. देशातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये विशेषतः विद्यापीठांमध्ये ही प्रगत सुविधा सुरु करणारे मुंबई विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. या प्रगत तंत्रज्ञान सुविधेची पहिली चाचणी आज मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, टीआयएफआरमधील प्राध्यापक एम.एन. वाहिया, एमयु एक्सलरेटर सेंटरच्या प्रमुख प्रा. वर्षा केळकर माने, डॉ. सिद्धार्थ कस्तुरीरंगन आणि डॉ. अभिजीत भोगले यांच्यासह चमुच्या उपस्थितीत करण्यात आली. मुंबई विद्यापीठात कार्यान्वित होत असलेल्या या सुविधेमुळे पुरातत्वशास्त्र आणि प्राचीन इतिहासाची उकल करण्यास हे केंद्र सज्ज असून ५० हजार वर्षापूर्वीच्या इतिहासाची अचूक नोंद घेऊन त्याची परिणामकारकता शोधून काढण्याची क्षमता या केंद्राकडे आहे. भारतातील अत्यंत प्राचीन संस्कृती आणि मानवनिर्मित साहित्य,

"भारतातील पहिले कार्बन डेटिंग एक्सलरेटर मास स्पेक्ट्रोमेट्री सेंटर आजपासून मुंबई विद्यापीठात पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होत आहे याचा आम्हाला विशेष आनंद होत आहे. मुंबई विद्यापीठाने प्रगत संशोधनाच्या दिशेने उचलेले हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. देशातील विद्यापीठांमध्ये अशी अद्ययावत पहिली सुविधा मुंबई विद्यापीठात सुरु होत असल्यामुळे पुरातत्व आणि प्राचीन संस्कृती बरोबरच इतिहासाची उकल करण्यास देश भरातील विद्यार्थी, संशोधक आणि उद्योगांना याचा मोठा फायदा होणार आहे. भारतीय ज्ञान परंपरेवर विशेष संशोधन करण्यावर भर दिला जाणार असून या सुविधेच्या सहाय्याने संशोधनाची नवी दालने विद्यापीठात खुली होणार आहेत".

- **प्रा. रवींद्र कुलकर्णी,** कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

पुरातन काळातील अनेक बाबींबरोबरच बायोमेडिकल आणि अणूऊर्जेच्या संशोधनात हे केंद्र महत्वाची भूमिका बजावणार आहे. मुंबई विद्यापीठातील या सुविधा फक्त पुरातत्त्वीय समुदायांच्या गरजा पूर्ण करणार नाही तर भूगर्भशास्त्र, वनस्पती, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्राबरोबरच इतिहासावर देशातील विविध भागांमध्ये परिमाणवाचक अभ्यासासाठी या सुविधेचा उपयोग होणार आहे. हा अत्याधुनिक एक्सलरेटर नेदरलँडमधील एचव्हीईई कंपनीकडून विकत घेण्यात आला आहे.

कार्बन डेटिंगसाठी एक्सलरेटर मास स्पेक्ट्रोमेट्री (एएमएस) या कालमापन यंत्राची सुविधा ही बीआरएनएस प्रकल्प आणि मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्यातून साकारण्यात आली असून मुंबई विद्यापीठातील भौतिक शास्त्र विभागातील माजी प्राध्यापक डॉ. डी. सी. कोठारी आणि टीआयएफआरमधील प्राध्यापक एम.एन. वाहिया यांच्या पुढाकारातून या प्रकल्पावर काम केले गेले. मुंबई विद्यापीठातील या अद्ययावत कार्बन डेटिंग एक्सलरेटर सेंटर प्रकल्पाचे वैशिष्ट्ये म्हणजे या सुविधेचा लाभ फक्त मुंबई विद्यापीठापुरताच मर्यादित न ठेवता या सुविधेचा लाभ सर्व भारतीय शास्त्रज्ञाना आणि उद्योगांना होणार आहे. मुंबई विद्यापीठाने उचललेले हे एक ऐतिहासिक पाऊल असून भारतीय पुरातत्व समुदायाचे स्वप्न सत्यात उतरणार आहे. आजमितीस कार्बन डेटिंगसाठीचे नमुने हे परदेशात पाठविले जातात ज्यासाठी जवळपास ६०० डॉलर्स इतका खर्च येतो, भारतातील विशेषतः मुंबई विद्यापीठात या केंद्राच्या सहाय्याने आता पुरातत्व शास्त्राशी निगडीत गरजा भागविण्यासाठी मुंबई विद्यापीठ सज्ज होत आहे. या मशीनच्या सहाय्याने कोणत्याही ऐतिहासिक वस्तूची अचूक परिणामकारता शोधून काढली शक्य होणार आहे. आज भारत देशाला मोठा ऐतिहासिक वारसा आणि प्राचीन व समृद्ध परंपरा लाभली आहे. त्यादृष्टीने पुरातत्व आणि प्राचीन संस्कृती बरोबरच इतिहासाची उकल करण्यास येथील विद्यार्थी, संशोधकांना याचा मोठा फायदा होणार आहे. सध्या जगात अशा ४५ मशीन कार्यान्वित असून

युरोपमध्ये २२, अमेरिकेत ९, जपानमध्ये ८, ऑस्ट्रेलियात ३, न्यूझीलंड कॅनडा, चीन आणि कोरीया येथे प्रत्येकी १ मशीन आहेत.

**या प्रकल्पाअंतर्गत संशोधन क्षेत्रे:**

**रेडिओकार्बनसाठी AMS पुरातत्वशास्त्रीय नमुने डेटिंग:**

* पुरातत्त्वीय साइट्स आणि नमुने यांचे डेटिंग.
* दुर्मिळ वस्तूंवरील सूक्ष्म नमुन्यांची डेटिंग.
* विषम पदार्थात वैयक्तिक अपूर्णांकांचे विश्लेषण.

**कॅलिब्रेशन:**

* कॅलिब्रेशनसाठी भारतीय डाटाबेस तयार करणे.

**परमाणु उद्योगासाठी:**

अणुऊर्जा प्रकल्पातून 14C ची मापन

तलावाच्या तळघरणाची डेटिंग:

तळाच्या आत वैयक्तिक स्तरावर डेटिंग.

**बायोमेडिकल ऍप्लिकेशन्स:**

अणूच्या पातळीवर मोजमाप

बायोमेडिकल ट्रॅक्टर म्हणून रेडियोआयसोटोपचा वापर.

अशा विविध संशोधनाच्या क्षेत्रांवर काम केले जाणार आहे.

**नेमका या तंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रात कसा होतो ?**

१) एखाद्या जीवाचे कालमापन करण्यासाठी : जेव्हा एखादा जीव मरतो तेव्हा कार्बनची देवाणघेवाण होणे थांबते आणि कालांतराने 14 c चा नाश होतो, या मध्ये 12c : 14 c गुंणोत्तर एखाद्या जीवाच्या मृत्यूनंतर निघून गेलेल्या वेळशी संबंधित असतो.

२) एक्सलरेटर मास स्पेक्ट्रोमेट्रीचा वापर बायोमेडिकल संशोधनात मोठ्या प्रमाणावर केला जातो.

३) रेडिओ कार्बन डेटिंगच्या मदतीने, संशोधक एक प्रकारचे घड्याळ म्हणून वापरू शकतात जे त्यांना भूतकाळात डोकावण्यास आणि लाकडापासून ते अन्न, परागकण, मलमूत्र आणि अगदी मृत प्राणी आणि मानवांपर्यंत सर्व गोष्टींसाठी अचूक कालखंड निर्धारित करण्यास अनुमती देते.

# दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्याधारीत शिक्षण देण्यावर भर द्यावा

## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचा ५५ वर्धापन दिन समारंभ उत्साहात साजरा



दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ५५ व्या वर्धापन दिनी अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी



दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ५५ व्या वर्धापन दिनी प्रमुख पाहुणे म्हणून संवाद साधताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे

मुंबई, दि. २४ मार्चः जग आपल्याकडे संधीच्या रुपात पाहत असल्याने अनेक क्षेत्रासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून अधिकाधीक कौशल्याधारीत आणि रोजगारक्षम अधिकाधिक राबविण्यावर भर देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी केले. ते आज मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ५५ व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितांशी संवाद साधत होते. याप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, सीडीओईचे संचालक प्रा. शिवाजी सरगर आणि उपसंचालक डॉ. मधुरा कुलकर्णी यांच्यासह विविध मान्यवर आणि शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे ते म्हणाले, देशातील सर्वात मोठे बंदर म्हणून पुढे येत असलेल्या वाढवण बंदराला लागणाऱ्या कुशल मनुष्यबळासाठी विद्यापीठांकडे मोठी संधी आहे. या संधीमुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवता येणार आहे. तांत्रिक कौशल्यासह अतांत्रिक कौशल्य विकसित करून विद्यापीठाने पुढाकार घ्यावा लागेल. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुढाकारातून संशोधनाचे पुष्प पुस्तक रुपाने तयार करण्यात आले असून संशोधनाचे विषय ते अहवाल लिहण्यापर्यंत १०० पानांचे पुष्प तयार करण्यात आले आहेत यासाठी दोन्ही विद्यापीठाने पुढे येऊन नवीन कौशल्य आत्मसात करण्यासाठी डेटा अॅनॅलिसीस, क्रिटीकल थिंकिंग, अॅनॅलिटीकल थिंकींग, अशा अतांत्रिक कौशल्यांवर काम करण्याची दोन्ही विद्यापीठाने संयुक्तपणे काम करण्याची



दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ५५ व्या वर्धापन दिनी उपस्थित मान्यवर

संधी असल्याचे सांगितले. तसेच मुलभूत अतांत्रिक कौशल्य तयार करण्यावर भर द्यावा लागणार असून अनेक कौशल्य पुढील पिढीपर्यंत घेऊन जाण्यात खूप मोठी संधी असल्याचे सांगत यासाठी भूमिकेत आणि दृष्टिकोनात बदल करावा लागणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ऑनलाईन आणि दूरस्थ शिक्षणासाठी ह्युटागॉजी "स्वयं-निर्धारित शिक्षण" पद्धती म्हणून जगभर प्रचलित आहे. जिथे शिकणाऱ्यांच्या गरजा आणि आवडीनुसार शिक्षण दिले जाते. त्यामुळे शिकणाऱ्यांच्या अनुषंगाने शिक्षण व्यवस्था तयार करावी लागेल. विद्यार्थी हा केंद्रबिंदु लक्षात घेऊन त्याच्या क्षमतेप्रमाणे त्याला अपेक्षित शिक्षण देणे गरजेचे आहे. दूरस्थ शिक्षणात शिकणारा विद्यार्थी हा समोर नसतो, त्यामुळे त्याच्या हातात येणारे अध्ययन साहित्य हे प्रत्यक्ष अनुभव देणारे असावे, म्हणजेच वर्गात शिक्षक शिकवत असल्याचा भास निर्माण होऊन प्रत्यक्ष समृद्ध अनुभव विद्यार्थ्यांना मिळू शकेल यासाठी तशा पद्धतीचे अध्ययन साहित्य तयार करून मांडले जाणे हा जगभरातील महत्वाचा प्रचलित ट्रेंड असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण पद्धतीत होणाऱ्या बदलांवर



दृष्टिक्षेपात सीडीओई पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) प्रा. सीमा मुसळे, संचालक प्रा. शिवाजी सरगर कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि उपसंचालक डॉ. मधुरा कुलकर्णी

प्रकाश टाकत काळाची पावले ओळखत सीडीओईने मार्गक्रमण करण्याच्या सूचना दिल्या. भारतासह जगभरात संधीचे अमर्यादित दालन खुले होत असून त्याअनुषंगाने विस्तारीत होत असलेल्या ऑनलाईन, ब्लेंडेड, हायब्रिड, आणि मायक्रो लर्निंगनुसार अधिकाधिक अभ्यासक्रम तयार करावे, पारंपारिक अभ्यासक्रमांसोबतच रोजगारक्षम कौशल्याधारित अभ्यासक्रम राबविण्यावर सीडीओईने भर द्यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. इंडस्ट्री ४.० च्या अनुषंगाने, तसेच वर्ल्ड इकोनॉमिक फोरमच्या २०२५ च्या अहवालात नमूद करण्यात आलेल्या नवीन कौशल्याच्या अनुषंगानेही अभ्यासक्रम तयार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. दुहेरी पदवीच्या शिक्षणासाठी सीडीओईनी पुढाकार घेतला असून याची व्याप्ती वाढविण्यावर भर द्यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. महास्वयंमच्या माध्यमातून सीडीओईसाठी मोठी संधी उपलब्ध होणार ऑनलाईन शिक्षणाच्या दृष्टिकोनातून सीडीओईला मोठी झेप घेता येईल असेही कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. सीडीओईने कृत्रिम बुद्धिमत्तेचे शिक्षण ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर भर देतानाच नॅनो टेक्नोलॉजी आणि सेमी कंडक्टरच्या क्षेत्राला लागणारे कुशल मनुष्यबळासाठी सीडीओईने तयारी करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बदल करून सक्षम व्हावे लागेल असे सांगत त्यांनी साहचर्य आणि सहकाराच्या भूमिकेतून सीडीओईने वाटचाल करावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सीडीओईचे संचालक प्रा. शिवाजी सरगर यांनी सीडीओईच्या १९७१ पासूनच्या समृद्ध प्रवासावर प्रकाश टाकून संस्थेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. सीडीओईच्या उपसंचालिका डॉ. मधुरा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल सर्वांचे आभार मानले.

## विद्यापीठाचा सर्वसमावेशक विद्यार्थी केंद्रीत रु. ९६८.१८ कोटींचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर

मुंबई, दि. २२ मार्च: गुणवत्ता, सर्वासमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देत मुंबई विद्यापीठाचा २०२५- २६ या वित्तीय वर्षाचा रुपये ९६८.१८ कोटींचा अर्थसंकल्प आजच्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या अधिसभेत यावर्षीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये १४७ कोटी ६३ लाखांची तूट दाखविण्यात आली आहे. २०२५-२६ वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरण, उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार, विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम, माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ-औद्योगिक साहचर्य उपक्रम यासह शैक्षणिक आणि गव्हर्नंस उत्कृष्टता उपक्रमांसाठी ७५ कोटींची भरीव तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये विविध नाविण्यपूर्ण योजनांसह अनेक विकासकामांना प्राधान्य देण्यात आले



अधिसभेत वार्षिक अर्थसंकल्प सादर करण्यासाठी उपस्थित मान्यवर

आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, प्रा. बाळ आपटे दालन आणि सभागृह, स्कूल ऑफ लँग्वेजेस इमारत दुसरा टप्पा, अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह दुसरा टप्पा, मुलींचे वसतिगृह, वेंगुर्ले येथील सागरी अध्ययन केंद्र आणि तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासी संकुल व सामुदायिक सभागृह अशा अनुषंगिक विकासकामांना प्राधान्य देत १३५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्गवारीतील सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, विद्यापीठ विभाग रँकिंग, शैक्षणिक ऑडिट पोर्टल आणि रँकिंग फ्रेमवर्क, प्रतिष्ठित प्राध्यापकांची व्याख्याने, कुलगुरू योजना, ई-सामग्री विकास आणि महा-स्वयमसाठी शिक्षकांचे प्रशिक्षण, राज्य आणि राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ/संस्थात्मक सहयोग आणि संबंध (विद्यार्थी/शिक्षक विनिमय, संयुक्त संशोधन कार्यक्रम, ट्विनिंग/जॉइंट/ड्युअल डिग्री प्रोग्राम), स्कूल कनेक्ट आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी (प्रशिक्षण, जागरूकता कार्यशाळा, डिजिटलायझेशन इ.), बीकेएस (भारतीय ज्ञान प्रणाली) सेल, अध्यापन-शिक्षण-मूल्यांकनामध्ये एआय सहाय्य/सक्षम/निर्देशित प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा वापर अशा शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी रुपये १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरणावर भर देत संशोधन विकास कक्ष, केंद्रीय संशोधन, उपकरणे आणि डिजिटलायझेशन सुविधा, सर्वोत्कृष्ट संशोधक आणि नवोपक्रम पुरस्कार, संशोधक आणि नवकल्पनांसाठी प्रोत्साहन, अविष्कार विजेत्यांना प्रोत्साहन आणि स्टार्ट-अप उपक्रमांना सहाय्य, नोबेल विजेत्यांची व्याख्यानमाला, बौद्धिक संपदा अधिकारांना प्रोत्साहन, ग्लोबल इनिशिएटिव्ह, मोबाईल टेक्नॉलॉजी आणि इनोव्हेशन प्रात्यक्षिक व्हॅन, क्रिटिकल आणि इमर्जिंग टेक्नॉलॉजीज (प्रगत संगणन आणि सेमीकंडक्टर्स, प्रगत साहित्य आणि नॅनोटेक्नॉलॉजी, क्वांटम माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान, अनुवांशिक अभियांत्रिकी, सायबर सुरक्षा, महासागर संशोधन, शाश्वत शेती, विषाणूशास्त्र, हवामान अनुकूलता विकास, आणि कार्यक्षमता संशोधनाला प्रोत्साहन, आरोग्यसेवा, स्मार्ट शहरे, स्मार्ट गतिशीलता आणि वाहतूक विषयांवरील संशोधनाला चालना देण्यासाठी १५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रमांसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली असून यामध्ये सिंगल विंडो सिस्टीम आणि स्टुडंट हेल्पडेस्क, लर्नर सपोर्ट सिस्टीम, समान संधी सेल, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांसाठी सुविधा, युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यू सेल, सुवर्ण पदके आणि मेरिट अवॉर्ड्स/स्कॉलरशिप मध्ये वाढ अशा योजनांचा समावेश आहे. माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ-औद्योगिक साहचर्य उपक्रमासाठी रुपये ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या उद्देश्याने उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार घेत विद्यापीठाने या वित्तीय वर्षात रुपये ५ कोटींची तरतदू केली आहे. ज्यामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी समर्थन आणि लिंकेजसाठी केंद्र, परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आणि नावनोंदणीसाठी सिंगल विंडो सिस्टीम, रँकिंग आणि ब्रँडिंग उपक्रम, जागतिक दर्जाच्या विद्यापीठांसह सहयोग आणि संबंध (विद्यार्थी/आणि फॅकल्टी एक्सचेंज, संशोधन भागीदारी, स्टडी अब्रॉड प्रोग्राम/इंटर्नशिप, ट्विनिंग/जॉइंट/ड्युअल डिग्री प्रोग्राम, क्रेडिट ट्रान्सफर मेकॅनिझम अशा अनुषंगिक उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे शासन (गव्हर्नंस) गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देण्यासाठी विद्यापीठाने रुपये ३५ कोटींची भरीव तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. विकसित भारत @ २०४७ च्या अनुषंगाने विद्यापीठाचा पुढाकार, अमृतकाळाच्या पूर्वसंध्येला नाविन्यपूर्ण कार्यक्रम, जागतिक दर्जाचे विद्यापीठ म्हणून मुंबई विद्यापीठाचा मास्टर प्लॅन, कार्बन न्यूट्रल ग्रीन कॅम्पस उपक्रम, फोर्ट, विद्यानगरी आणि इतर उपपरिसरांतील पायाभूत सुविधांचे अद्ययावतीकरण, व्हिसी फेलो, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी कल्याणकारी उपक्रम, महिला कल्याण योजना, क्रीडा सुविधेचे ऑलिम्पिक मानकांमध्ये सुधारणा, दिव्यांग स्नेही कॅम्पस, वारसा संवर्धन, विद्यार्थी भवनाचे बांधकाम, आरोग्य केंद्राचे अपग्रेडेशन, डिजिटल उपक्रम: पेपरलेस गव्हर्नन्स, डिजिटल लायब्ररी, रेकॉर्ड/हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, डेटा सेंटरचे क्लाउड बेस्ड सिस्टममध्ये अपग्रेडेशन, व्ही.सी. फेलो, सर्वोत्तम प्रशासकीय विभाग: सामान्य प्रशासन, परीक्षा, वित्त, महाविद्यालयीन कर्मचारी- शहरी आणि ग्रामीण, सर्वोत्कृष्ट सिनेट सदस्य, सर्वोत्कृष्ट विद्या परिषद सदस्य यासाठी पुरस्कार, युनिव्हर्सिटी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी सेल (USRC) ज्यामध्ये शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, समुदाय सहभाग, रक्तदान अशा अनुषंगिक बाबींचा समावेश असलेला सर्वसमावेशक अर्थसंकल्प अधिसभेने मंजूर केला.

अशा प्रमुख ठळक वैशिष्ट्यांवर आधारीत वित्तीय वर्ष २०२५-२६ चा रुपये ९६८.१८ कोटींचा अर्थसंकल्प सीए. हर्षल वाघ, वित्त व लेखा अधिकारी यांनी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य. डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, यांच्या उपस्थितीत अधिसभेच्या मान्यवर सदस्यांसमोर सादर केला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या आदेशान्वये विद्यापीठाने या वर्षीचा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी विद्यापीठ उपपरिसर, विद्यापीठ विभाग व आंतरविद्याशाखा अभ्यास मंडळ, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, माहिती व तंत्रज्ञान मंडळ आणि अधिष्ठाता आणि सहयोगी अधिष्ठाता या सर्वांचे सक्रीय सहभाग आणि मौलिक मार्गदर्शन लाभले.

वार्षिक लेखे अहवाल आणि वार्षिक अहवाल अधिसभेत मंजूर सादर

मे. किशोर अँड कंपनी (सी.ए.) यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२३ चा ताळेबंद व लेखापरीक्षण अहवाल आज पार पडलेल्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ चा मुंबई विद्यापीठाचा वार्षिक अहवाल अधिसभेत मंजूर करण्यात आला.

## २०२५-२०२६ नाविन्यपूर्ण योजना/उपक्रम

- ❖ गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता शैक्षणिक उपक्रम १० कोटी
- ❖ संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार १५ कोटी
- ❖ विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम ५ कोटी
- ❖ माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ- औद्योगिक साहचर्य उपक्रम ५ कोटी
- ❖ उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार ५ कोटी
- ❖ गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता गव्हर्नंस उपक्रम ३५ कोटी
- ❖ २०२५-२०२६ या वर्षामधील नियोजित बांधकामे-
- ❖ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र- रुपये १५ कोटी
- ❖ तृतीय व चतूर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासी संकूल व सामुदायिक सभागृह- रुपये ५० लाख
- ❖ प्रा. बाळ आपटे दालन – रुपये २५.९१ कोटी
- ❖ स्कूल ऑफ लॅंग्वेजेस इमारत (२ रा टप्पा), अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र - रुपये १४ कोटी
- ❖ आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह (२ रा टप्पा)- रुपये ५० लाख

## मुंबई विद्यापीठात जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेचे आयोजन




मुंबई विद्यापीठात आयोजित जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेसाठी उपस्थित स्पर्धक, मार्गदर्शक आणि मान्यवर

मुंबई, दि. २३ मार्च: तरुणांना विकसित भारत निर्माण करण्याच्या त्यांच्या विचारांना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना आणि नेहरू युवा केंद्र संघटन यांच्या सयुंक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात आज जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेचे आयोजन करण्यात आले होते. युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, विद्यापीठ विद्यार्थी भवन येथे आयोजित केलेल्या या युवा संसदेमध्ये मुंबई उपनगर व ठाणे जिल्ह्यातील ५० स्पर्धकांनी सादरीकरण केले. या स्पर्धेसाठी एकूण २५३ सहभागींनी नोंदणी केली होती. पहिल्या फेरीच्या छाननीमध्ये १३७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली, त्यातून राज्यस्तररीय युवा संसदेसाठी १० अंतिम स्पर्धकांची निवड आज करण्यात आली.

अत्यंत चुरशीच्या निवड प्रक्रियेत सहभागी युवकांनी विकसित आणि समृद्ध राष्ट्र घडवण्यासाठी त्यांचे विचार, दृष्टी आणि आवड दाखवत विचार मांडले. आजच्या युवा संसद स्पर्धेतील हे १० अंतिम स्पर्धक आता २६ आणि २७ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय निवडीसाठी पुढे जाणार आहेत, जिथे त्यांना मोठ्या व्यासपीठावर

त्यांच्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

आपल्या देशाच्या विकासात युवा सहभागाचे महत्त्व ओळखून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रीय समस्यांमध्ये तरुण मनांना सहभागी करून, विकसित भारत युवा संसद माहितीपूर्ण, जबाबदार आणि सक्रिय नागरिक घडवण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून काम करते. जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसद हा राष्ट्रीय सेवा योजना आणि नेहरू युवा संघटन द्वारे भारतातील तरुणांना प्रेरणा, शिक्षण आणि सक्षम बनवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग असून युवा सक्षमीकरण आणि सहभागाच्या दिशेने हे कार्यक्रम महत्त्वाचे पाऊल ठरले.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या स्पर्धेसाठी निरीक्षक म्हणून डॉ. विजय कुकरेजा, डॉ. मिलिंद धारवडकर, श्री. महेश देशमुख, श्री कुणाल गवाणकर , आणि श्री निशांत रौतेला यांनी काम पाहिले. तर योगेन राजेंद्र सावंत, अमोघ आनंद खातवकर, हर्ष वसुदत्त ठाकूर, आर्या सचिन बसरे, दिपाक्षी भारती, मनषा मनोज खत्री, सुजल हरिहर साहू, चस्मीत कौर विर्दी, भूमी श्रीपत भोईर आणि शारण्या अभिजीत सावंत या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय युवा संसदेसाठी निवड झाली असल्याचे राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक श्री सुशील शिंदे यांनी सांगितले.

## मुंबई विद्यापीठ आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

### दुहेरी पदवी, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धीमत्ता, परदेशी भाषांसह अनुसंधान नेशनल रिसर्च फाऊंडेशनच्या स्पोक प्रारूपाअंतर्गत संयुक्त संशोधन, विकास आणि प्रशिक्षणाच्या विविध संधीचे दालन खुले

मुंबई, दि.२१ मार्चः पुण्यातील सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी आता मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रातून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रविष्ठ होऊन एकाच वेळी दोन पदव्या घेऊ शकणार आहेत. या अनुषंगाने आज मुंबई विद्यापीठ आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या पदवीच्या बीए. बीकॉम, बीकॉम (अकाऊंटिंग अँड फायनान्स ), बीएस्सी (माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र) या अभ्यासक्रमांना दुहेरी पदवीसाठी प्रविष्ठ होऊ शकतील. तर पदव्युत्तर शिक्षणासाठी एमए (इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क, शिक्षणशास्त्र) एमकॉम ( एडव्हान्स अकाऊंटन्सी, बिझनेस मॅनेजमेंट) एमएस्सी (मॅथेमॅटिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि संगणकशास्त्र, एमएमएस आणि एमसीए अशा अभ्यासक्रमांची निवड करू शकतील. एवढेच नाही तर



**सामंजस्य करार प्रसंगी उपस्थित (डावीकडून) डॉ. सुनिल पाटील, प्रसाद कारंडे, प्रा. रवींद्र कुलकर्णी, आणि प्रा. पराग सदगीर**

मल्टिडिसिप्लिनरी मायनर अंतर्गत मुंबई विद्यापीठाच्या फ्रेंच, जर्मनसह विविध भाषा विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रमासही अभियांत्रिकीचे विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील. आज झालेल्या कराराच्या वेळी मुंबई विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे आणि सीओईपी विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू प्रा. सुनिल भिरूड, स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. पराग सदगीर आणि कुलसचिव डॉ. डी. एन. सोनवणे उपस्थित होते.

दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ या दोन्ही उच्च शैक्षणिक संस्थात झालेल्या कराराच्या अनुषंगाने सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे हे यजमान विद्यापीठ म्हणून काम पाहणार आहे. तर दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ सहयोगी संस्था म्हणून काम पाहणार आहे. मुंबई विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना विदेशी भाषा शिकवतील. मुंबई विद्यापीठाच्या कल्याण येथील स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड अप्लायड सायनेन्स स्थापन होणाऱ्या रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्ट केंद्रातील संयुक्त प्रकल्प आणि संशोधन उपक्रमासाठीही दोन्ही विद्यापीठ सोबत काम करतील. तसेच अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशनच्या आयआयटी मुंबई या हब मधील स्पोक म्हणून काम करणाऱ्या मुंबई विद्यापीठ आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ हे संयुक्त संशोधन प्रकल्पावर काम करणार आहेत.

“राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विशिष्ट क्षेत्रात करिअर करण्यासाठी आणि त्याच वेळी भाषिक ज्ञान आणि संवाद कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी मिळावी यावर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारक्षमता, गुणवत्ता आणि सर्जनशीलता वाढवण्यासाठी त्यांना विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला, भाषा, तसेच व्यावसायिक आणि तांत्रिक विषयांसारख्या विविध विषयांमधील शिक्षणाची उपलब्धता करून देण्यासाठी या कराराचे महत्व अधोरेखित होणार आहे.”

- **प्रा. रवींद्र कुलकर्णी,** कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

“गेल्या काही वर्षांपासून सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा नागरी सेवेत जाण्याचा कल वाढीस लागल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच वेळी सामाजिक शास्त्रे, कला आणि भाषा विषयीचे शिक्षण सोबतच उपलब्ध झाल्यास त्यांना याचा मोठा फायदा होऊ शकेल. त्या अनुषंगाने या कराराचे फार महत्व आहे.”

- **प्रा. सुनिल भिरूड,** कुलगुरू, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ

## विद्यापीठात रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्ट केंद्र स्थापन

## स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लायड सायन्सेस कल्याण येथे सेंटरची स्थापना

## उद्योन्मुख आणि प्रगत क्षेत्रासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने मुंबई विद्यापीठाची वाटचाल

मुंबई, दि. २० मार्चः उद्योन्मुख आणि प्रगत क्षेत्रासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने मुंबई विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकत सेंटर फॉर एक्सलन्स इन रोबोटिक्स अँड एआयची (रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्ट केंद्र) स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लायड सायन्सेस कल्याण येथे या सेंटरची स्थापना होणार आहे. नुकताच मुंबई विद्यापीठ आणि रोबोटिक्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या जॅन्युटेक इंडस्ट्री यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या कराराच्या अनुषंगाने रोबोटिक्स सिस्टम, ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारीत एप्लीकेशन्स, विद्यार्थी आणि संशोधकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि प्रकल्पांवर काम करण्याची मोठी संधी उपलब्ध होईल. विशेष म्हणजे या सेंटरच्या माध्यमातून अत्याधुनिक रोबोटिक प्रणालींसह प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा समावेश असलेला 'एमटेक इन रोबोटिक्स' हा पदव्युत्तर अभ्यासक्रम याच शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल.

मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लायड सायन्सेस कल्याण येथील विस्तीर्ण केंद्रातील सुमारे ४५ हजार चौरस फुटावर हे सेंटर तयार केले जाणार आहे. हे केंद्र रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि औद्योगिक ऑटोमेशनमधील संशोधन, विकास आणि प्रशिक्षणासाठी केंद्र म्हणून काम करेल. उद्योन्मुख आणि प्रगत क्षेत्रातील गरजा आणि औद्योगिक आव्हानांवर मात करण्यासाठी या केंद्राच्या माध्यमातून सहयोगी संशोधनास प्रोत्साहन दिले जाईल. तसेच रोबोटिक्स आणि ऑटोमेशनमधील कौशल्ये वृद्धीसाठी या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक आणि व्यावसायिकांसाठी कार्यशाळा, चर्चासत्रे आणि प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येईल. कराराच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठ आणि जॅन्युटेक इंडस्ट्री यांच्या माध्यमातून तरुण अभियंते आणि विद्यमान औद्योगिक कर्मचाऱ्यांना कौशल्ये देण्यासाठी संयुक्तपणे प्रमाणित रोबोटिक्स प्रोग्रामिंग/ऑपरेटर प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. जॅन्युटेक इंडस्ट्रीच्या माध्यमातून औद्योगिक गरजा, आव्हाने आणि संशोधन विषयावर काम केले जाणार तर मुंबई विद्यापीठाच्या माध्यमातून शैक्षणिक कौशल्य आणि संशोधन प्रतिभा यासाठी योगदान देण्यात येणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लायड सायन्सेस कल्याण येथे स्थापन होत असलेल्या या केंद्राच्या माध्यमातून रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील प्रगत शिक्षण आणि संशोधनाला नवीन दिशा मिळणार असून यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच या केंद्राच्या स्थापनेमुळे विद्यार्थ्यांसाठी संशोधन आणि विकासाच्या नवीन संधी उपलब्ध होणार असून त्यांच्यात आधुनिक रोबोटिक प्रणालींवर काम करण्याची क्षमता आणि नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यास ते सक्षम होऊ शकतील असेही त्यांनी सांगितले.

# ‘युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई लॉ अकॅडमी’ (उमला) ची ऐतिहासिक कामगिरी

## जेनेव्हा येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत करणार भारताचे प्रतिनिधित्व

### दुसऱ्या फेरी दरम्यान पटकावला जगात प्रथम क्रमांक


आर्या गौतम आणि संस्कृती शर्मा यांचे अभिनंदन करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी आणि उमलाच्या संचालिका प्रा. राजेश्री वऱ्हाडी

मुंबई, दि. २० मार्चः मुंबई विद्यापीठाच्या ‘युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई लॉ अकॅडमी’ (उमला) ने ऐतिहासिक कामगिरी करत आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळवला. उमलात विधीचे शिक्षण घेणाऱ्या आर्या गौतम आणि संस्कृती शर्मा यांनी ‘जनरेटिव्ह एआय आणि कॉपीराइट कायदा’ या विषयावर उत्तम सादरीकरण करून दुसऱ्या फेरीत जगात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या दोन विद्यार्थीनी आता स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे आयोजित होत असलेल्या आंतरराष्ट्रीय मूट कोट स्पर्धेत भारताचे नेतृत्व करणार आहेत. युनायटेड नेशनच्या वर्ल्ड इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑर्गेनायझेशन (WIPO ) तर्फे आयपी मूट कोर्ट या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कायदेशीर विचारांमधील स्पष्टता, बौद्धिक संपदा जागरूकता आणि नवोपक्रमाला चालना देण्याच्या उद्देश्याने संयुक्त राष्ट्रांची विशेष एजन्सी असलेल्या जागतिक बौद्धिक संपदा संघटने मार्फत या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन जगभरात करण्यात आले आहे. दोन निवड फेऱ्यांचा समावेश असलेल्या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात नोव्हेंबर २०२४ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या चमूने व्हीडीओ सादरीकरण केले, ज्यामध्ये फक्त १८ संघ पुढील टप्प्यात पोहोचले. २५ ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान झालेल्या दुसऱ्या टप्प्यात या चमूने आभासी फेरीत एका जटिल कायदेशीर काल्पनिक प्रकरणावर युक्तिवाद करून जगात प्रथम क्रमांक प्राप्त केला. साओ पाउलो विद्यापीठ (दुसरे), नॅशनल लॉ यूनिवर्सिटी दिल्ली (तिसरे) आणि ओटावा विद्यापीठ (चौथे) सारख्या आघाडीच्या संस्थांमधील स्पर्धकांमध्ये प्रथम क्रमांक पटकावण्याचा बहुमान विद्यार्थ्यांना मिळाला.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेची अंतिम फेरी २३ ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथील वर्ल्ड इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑर्गेनायझेशन (WIPO) मुख्यालयात होईल. मुंबई विद्यापीठाची चमू ‘जनरेटिव्ह एआय आणि कॉपीराइट कायदा’ यासारख्या उद्योन्मुख विषयांशी संबंधित जटिल कायदेशीर समस्यांवर सादरीकरण करणार आहे. या आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत कॅनडा, ब्राझील, स्वीडन, यूके, मेक्सिको, साऊथ आफ्रिका आणि फ्रान्स या देशातील १२ चमू सहभागी होणार आहेत. या चमूला उमलाच्या संचालक प्रा. राजेश्री वऱ्हाडी यांचे मार्गदर्शन लाभले. कठोर परिश्रम आणि समर्पणाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या कुमारी आर्या आणि संस्कृती यांचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यापूर्वी जून २०२३ मध्ये नेदरलँड येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेसाठी उमलातील पाच विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

# मुंबई विद्यापीठात महिला कौशल्य विकास मेळाव्याचे आयोजन

मुंबई, दि. १९ मार्चः मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या पुढाकारातून मुंबई विद्यापीठातील कलिना संकुलातील फिरोज शहा मेहता प्रांगणात गुरुवार दि. १० एप्रिल, २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत महिला कौशल्य विकास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठ व मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आर्थिक सबलीकरण व आर्थिक स्वालंबनासाठी स्वतःचा व्यवसाय सुरू करता यावा यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना आहेत. या व्यापक दृष्टिकोनातून आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संयुक्त उपक्रमातून या वर्षी बचत गटांतील महिलांना विशेष संधी देण्याच्या प्रयत्नातून या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सतत बदलणाऱ्या बाजारपेठेच्या गतिमान गरजा पूर्ण करण्यासाठी कौशल्य विकास आणि पुनर्कौशल्य या महत्त्वाच्या स्तंभांद्वारे महिलांना आजीवन कौशल्य विकासाची संधी प्रदान करण्याचा हा प्रयत्न आहे. हस्तांतरणीय कौशल्यांचे प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देऊन उद्योग वाढविण्यासाठी महिलांची रोजगारक्षमता सुलभ करता यावी याकरिता मुंबई विद्यापीठाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

मुंबई विद्यापीठाने या बचत गटांसाठी दालने (स्टॉल्स) उपलब्ध करून दिले आहेत. या महोत्सवात २५-५० बचत गट सहभागी होणार आहेत. त्यामध्ये बी, ई, एफ दक्षिण, एफ उत्तर, जी दक्षिण, एच पूर्व, एल, एम पश्चिम, एन, एस, पी उत्तर, आर दक्षिण या महानगरपालिका प्रशासकीय विभागातील बचत गटांचा समावेश आहे. महिला स्वयं रोजगार मार्गदर्शिका आणि मुंबई विद्यापीठाच्या सिनेट मेंबर रुची माने यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. या मेळाव्यात बचत गटांतील महिलांनी स्वयं प्रेरणेने बनवलेल्या विविध घरोपयोगी वस्तू जसे आभूषणे, कापडी पिशव्या, गोधडी, शिल्पकला, महिलांसाठीच्या-कार्यालयीन कामकाजाच्या पर्स, बॅग, कूड फेब्रिक ज्वेलरी, सजावटीच्या वस्तू, मुखवास, साबण, तेल, बिस्कीट, फॅन्सी चप्पल व विविध खाद्यपदार्थ अशी निरनिराळी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घेऊन महिलांनी अत्यंत काळजीपूर्वक, कष्टाने व स्वयं प्रेरणेने बनवलेल्या उत्पादनाची खरेदी करावी असे आवाहन मुंबई विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. महिलांनी कलाकुसरीने आणि मोठ्या कौशल्याने तयार केलेली विविध आभूषणे, संसारोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने जनतेच्या पसंतीला उतरतील याची खात्री बाळगत यापुढेही महिला सबलीकरणासाठी विशेषत: ग्रामीण महिलांसाठी वेगवेगळे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे आयोजित करण्यात येणार असून त्यांचा अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन विभागाचे संचालक प्रा. बळीराम गायकवाड व डॉ. सचिन लढ्ढा संचालक, नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभाग यांनी केले आहे. महिलांनी उपलब्ध करून दिलेल्या ह्या बचत गटांच्या उत्पादनांची जनतेला निश्चितच भुरळ पडेल व या निमित्ताने बचत गटांतील महिलांनाही अधिकाधिक उत्पन्न मिळेल असा विश्वास महिला स्वयं रोजगार मार्गदर्शिका श्रीमती रुची माने यांनी व्यक्त केला आहे. महिलांच्या बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना ओळख मिळावी, प्रसिद्धी मिळावी तसेच त्यातून महिलांना आर्थिक उत्पन्न मिळावे, यासाठी देखील मुंबई विद्यापीठाने हे एक प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

# ‘क्लायमेट स्कील प्रोग्राम’साठी ब्रिटिश कौन्सिलकडून मुंबई विद्यापीठाची निवड

## हवामान बदलांविषयी व्यापक जनजागृतीसाठी १२०० हून विद्यार्थ्यांना मिळणार कौशल्य प्रशिक्षण

मुंबई, दि. १८ मार्चः उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकत असलेल्या युवकांमध्ये हवामान बदलाविषयी व्यापक जनजागृती करून त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यात कौशल्य विकसीत करण्यासाठी ब्रिटिश कौन्सिलकडून ‘क्लायमेट स्कील प्रोग्राम’साठी मुंबई विद्यापीठाची निवड करण्यात आली आहे. ब्रिटिश कौन्सिल आणि एचएसबीसी यांच्या अर्थ सहाय्याने मुंबई विद्यापीठात क्लायमेट स्कील प्रोग्राम राबविला जाणार आहे. ब्रिटिश कौन्सिलच्या माध्यमातून ब्राझील, मेक्सिको, इंडोनेशिया, व्हियतनाम आणि भारतात हा उपक्रम राबवला जात आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली आत्मसात करणे आणि निरंतर विकासाचे उद्दिष्ट्य साधण्यासाठी ब्रिटिश कौन्सिलने देशभरातील उच्च शिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागविले होते. पूर्ण देशभरातून तीन उच्च शिक्षण संस्थाची निवड करण्यात आली आहे. यामध्ये मुंबई विद्यापीठाची निवड झाली आहे. विद्यापीठामधे स्थापन झालेल्या कार्बन न्यूट्रल ग्रीन कॅम्पस उपक्रमाअंतर्गत जैवविविधता प्रकल्प, पाणथळ भूमी संवर्धन, हरित कॅम्पस, रेन वॉटर हार्वेस्टिंग, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प असे विविध पर्यावरण पुरक राबविले जात आहेत. या पार्श्वभूमीवर या प्रकल्पावर काम करण्यास मुंबई विद्यापीठाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठातील डॉ. अपर्णा फडके, प्रा. इंदू जॉर्ज आणि डॉ. सुहास जेजूरीकर हे प्रकल्पाचे समन्वयक म्हणून काम करणार आहेत.

या उपक्रमाअंतर्गत उच्च शिक्षण संस्थामध्ये शिकत असलेल्या तरुणांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या क्लायमेट स्कील प्रोग्राम अंतर्गत युवकांमध्ये हवामान बदलांबाबत जागृकता, हवामान बदलांचे परिणाम आणि त्याची दाहकता कशी कमी करता येईल यावर भर दिला जाणार आहे. ब्रिटीश कौन्सिलने या प्रकल्पाअंतर्गत १३० प्रशिक्षक आणि ८०० विद्यार्थ्यांना हवामान बदलामुळे ज्या समस्या उद्भवतात अशा समस्या आणि परिणामांचा सामना कसा करायचा याचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट्य दिले होते. परंतु मुंबई विद्यापीठाने या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सात जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांनाही ह्या उपक्रमात सहभागी करून घ्यायचे ठरवले आहे. एकूण २२५ ट्रेनर्स आणि १२०० विद्यार्थी मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या सात जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतून निवडले जातील. स्थानिक स्वराज्य संस्था, विविध बिगरशासकीय संस्था, निमशासकीय आणि सेवाभावी संस्था यांनाही सहभागी करून घेण्यात येणार आहे. ह्या संस्थांच्या प्रतिनिधींनाही प्रशिक्षित केले जाणार आहे. मुंबई विद्यापीठामार्फत ह्या सर्व स्टेकहोल्डर्सना एकत्र आणून विद्यार्थांना सपोर्ट सिस्टम तयार करण्यात येईल आणि किमान १३० ठिकाणी हवामान बदलाच्या संदर्भातील स्थानिक समस्या आणि त्यांचे निराकारण करण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करता येतील त्यासंदर्भातील कृती आराखडा आणि प्रत्यक्षातील कृती ठरविण्यात

येतील न त्यांची पूर्तता करण्यात येईल. जसे काही ठिकाणी पब्लिक बायोडायव्हरसिटी रजिस्टर तयार करणे, पाणथळ भूमी संवर्धन, एनर्जी ऑडिट, असे उपक्रम करता येतील. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत २५ मास्टर ट्रेनर्स निवडले गेले असून या सर्वांचे प्रशिक्षण २२ ते २६ मार्च २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या ट्रेनर्सना ब्रिटीश कौन्सिलच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रशिक्षित केले जाणार आहे. हे मास्टर ट्रेनर्स मुंबई विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक आणि रिसर्च स्कॉलर आहेत.

## मुंबई विद्यापीठाच्या धर्मवीर आनंद दिघे ठाणे उप-परिसराचे बळकटीकरण

## १०० किलोवॅट क्षमतेच्या सौर प्लांटसह विविध पायाभूत सुविधांचे निर्माण

### पीएम-उषा योजनेअंतर्गत अनेक पायाभूत सुविधा कार्यान्वित

मुंबई, दि. १७ मार्चः झपाट्याने विकसित होत असलेल्या ठाणे शहरातील मुंबई विद्यापीठाच्या धर्मवीर आनंद दिघे ठाणे उप-परिसराचे बळकटीकरण केले जात असून या उपपरिसरात जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. पीएम-उषा योजनेअंतर्गत १०० किलोवॅट क्षमतेच्या सौर प्लांटसह खेळाचे सुसज्ज मैदान, रेन वॉटर हार्वेस्टिंग, अंतर्गत रस्ते, कुंपणभिंत आणि प्रवेशद्वाराचे बांधकाम केले जात आहे. यामधील १०० किलोवॅट क्षमतेच्या सौर प्लांट्सचे सौर पॅनल बसवण्यासाठी फ्रेमिंग फॅब्रिकेशनचे काम पूर्ण झाले आहे. तसेच अनुषंगिक कामे पूर्णत्वास आली असून चाचण्या घेतल्या जात आहेत. ठाणे उप-परिसर हे सौर उर्जेचा वापर करणारे विद्यापीठाचे पहिले उप-परिसर म्हणून ओळखले जाणार आहे. सुमारे ४८ लाख रुपये खर्चून विद्यापीठाने ही सुविधा तयार केली आहे.

ठाणे उप-परिसरातील १०० किलोवॅट क्षमतेच्या या सौर प्लांटमध्ये नेट मीटरिंग प्रणाली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून पूर्ण उप परिसराला हरित उर्जा मिळणार असून या प्रणालीतील नेट मीटर सिस्टमसह सौर पॅनेल आणि इन्व्हर्टर समाविष्ट असल्याने अतिरिक्त उर्जाही विकसित करून त्याचे नियोजन केले जाणार आहे. विशेष म्हणजे मासिक उर्जेच्या बिलात खूप मोठी बचत होणार असून उर्जेच्या सर्व गरजा पूर्ण करण्यास हे उप परिसर सक्षम बनणार आहे. साधारणपणे १०० किलोवॅट सोलर पॅनल प्रणाली पॅनलचा उपयोग करून प्रतिवर्षी १,३०,००० युनिट वीज निर्मिती निर्माण केली जाऊ शकणार आहे. या कार्यासाठी होणारा खर्च ६० टन कोळसा आणि त्यापासून निर्माण होणारे प्रतिवर्षी १०६ कार्बन डायऑक्साइड या पासून मुक्तता मिळणार आहे. विजेच्या वाढत्या मागणी आणि किमतीमुळे सरंक्षण मिळण्याच्या दृष्टिकोनातून आणि जीवाश्म इंधनावरील आपले अवलंबित्व कमी करण्यासाठी तसेच कार्बन न्युट्रल ग्रीन कॅम्पसच्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाने हे महत्वाचे पाऊल टाकले असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. याच धर्तीवर कल्याण येथील स्कूल ऑफ इंजिनीअरींग अँड अप्लाईड सायन्सेस येथे हा प्रकल्प

राबवला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. धर्मवीर आनंद दिघे ठाणे उप-परिसराच्या बळकटीकरणाचाच भाग म्हणून सुसज्ज मैदान, रेन वॉटर हार्वेस्टिंग, अंतर्गत रस्ते, कुंपणभिंत आणि प्रवेशद्वाराचे बांधकामही लवकरच पूर्णत्वास येणार असून नजीकच्या काळात जिल्हा नियोजन समितीमार्फत संगणक, प्रिंटर्स, वर्गखोल्यांमध्ये पब्लिक एड्रेस सिस्टम आणि सीसीटीव्ही बसविण्याचे कामे हाती घेतली जाणार असल्याचेही कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

## मुंबई विद्यापीठात महिला कर्तृत्वाचा गौरव सोहळा

## मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या महिला पदवीधर कॉर्नेलिया सोराबजी यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवार्थ राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन



उपस्थितांशी संवाद साधताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी

मुंबई, दि. १५ मार्चः मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या महिला पदवीधर तसेच भारतातील पहिल्या महिला वकील कॉर्नेलिया सोरोबजी यांच्या वकिलीच्या शताब्दी वर्षानिमित्त आणि विविध क्षेत्रांतील पहिल्या महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आज मुंबई विद्यापीठात महिला कर्तृत्वाचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. 'ब्रेकिंग ग्लास सिलिंगः वुमन हू मेड इट' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव सुजाता सौनिक या कार्यक्रमाच्या सन्माननीय अतिथी होत्या. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, परिसंवादाच्या निमंत्रक प्रा. कविता लघाटे यांच्यासह बीजमाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री राहीबाई पोपेरे, मानदेशी फाऊंडेशनच्या संस्थापिका चेतना गाला सिन्हा, इन्फिलबनेटच्या संचालिका प्रा. देविका मदाली, बालरोग तज्ज्ञ ज्योत्सना किर्तने, सामाजिक कार्यकर्त्या सुनिता हळदेकर, सीमा सिंह आणि गीताताई गुंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिला यावेळी उपस्थित होत्या. मुंबई विद्यापीठ, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद पश्चिम विभागीय केंद्र, श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र, प्रा. बाळ आपटे विद्यार्थी व युवा चळवळी अभ्यास केंद्र आणि लोकमान्य टिळक अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या एक



मराहाष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थितांना मार्गदर्शन करताना




मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचे स्वागत करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी

दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, महिलांनी कायम कृतीयोग्य ध्येयांसाठी काम केले पाहिजे. महिलांना मातृत्व आणि कामातील संतुलन साधताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यासाठी त्यांना पिता, बंधू आणि पती यांचा आधार मिळाला पाहिजे. भारताच्या पहिल्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश अण्णा चांडी, केरळ उच्च न्यायालयाच्या पहिल्या न्यायाधीश फातिमा बीवी आणि अशा असंख्य महिलांनी अधिक कठीण लढा दिला असल्याचे त्यांनी सांगितले. मागे वळून पाहिल्यास असे लक्षात येते की महिलांनी मोठी प्रगती केली आहे. महिलांना सक्षम करण्यात मुंबई विद्यापीठाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांच्या यादीवर नजर टाकल्यास, विविध क्षेत्रांतील अनेक कर्तृत्ववान महिला ह्या या विद्यापीठात घडल्या आहेत. आज प्रगती




प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थितांना संबोधित करताना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना




सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना यांचे स्वागत करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी

तीन घटकांच्या आधारे मोजली जाऊ शकते. पहिला घटक म्हणजे महिलांचा व्यावसायिक क्षेत्रात प्रवेश, दुसरा म्हणजे, ज्या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी त्यांनी लढा दिला, त्या क्षेत्रात किती महिला टिकून राहतात आणि तिसरा म्हणजे, किती महिला पुढे जाऊन सत्तापदांपर्यंत पोहोचतात असेही न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या सन्माननीय अतिथी म्हणून राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी तरुण महिलांना स्वप्न पाहण्यासाठी, पुढे जाण्यासाठी आणि जीवनात त्यांचे योग्य स्थान मिळवण्यासाठी प्रोत्साहित केले. एक कर्तृत्ववान महिला अनेक महिलांसाठी प्रेरणा आणि मार्गदर्शन करत असल्याचे त्यांनी सांगितले. एक प्रशासकीय अधिकारी म्हणून माझ्या स्वतःच्या प्रवासात, सार्वजनिक प्रशासनात महिलांची बदलती भूमिका स्वतः प्रत्यक्ष पाहिली असल्याचे सांगत, आव्हाने अजूनही असली तरी संधीही असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांना सक्षम करणारी धोरणे, समान संधींना प्रोत्साहन देणारी धोरणे आणि प्रगतीला अडथळा आणणारे अडथळे दूर करणाऱ्या धोरणांचा स्वीकार करून पुढील वाटचाल करूया असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. लंडनमधील सोमरविले कॉलेजमधील भेटी दरम्यान मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या महिला पदवीधर तसेच भारतातील पहिल्या महिला वकील कॉर्नेलिया सोरोबजी यांच्या कार्यकर्तृत्वाची महती सर्वांपर्यंत पोहचावी तसेच हा समृद्ध वारसा अनेक पिढ्याना प्रेरणा देत राहावा या व्यापक दृष्टिकोनातून हा कार्यक्रम आयोजित केला गेला असून, अशा कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळत राहावी यासाठी नजीकच्या काळात अनेक कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिसंवादाच्या निमंत्रक प्रा. कविता लघाटे यांनी केले.

उदघाटन सत्रानंतर इन्फ्लिबनेटच्या संचालिका प्रा. देविका मदाली यांच्या निरीक्षणात महिला नैसर्गिकरित्या अनेक कामे एकाच वेळी करीत असून त्या अधिक समजूतदार असल्याचे नमूद केले. महिला सक्षमीकरण म्हणजे पुरुषांचाही सहभाग अपेक्षित असून जग बदलण्यासाठी आपण हातात हात घालून चालले पाहिजे असेही यावेळी नमूद करण्यात आले. डॉ. ज्योत्स्ना किर्तने यांनी आनंदीबाई जोशी, कादंबिनी गांगुली आणि रखमाबाई राऊत या तीन महिला डॉक्टरांची यशोगाथा सांगितली. दुपारच्या सत्रात अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित नाटक आणि सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित "ज्योती, द फ्लेम" हा चित्रपट दाखवण्यात आला. दुपारच्या सत्रातील इतर वक्त्यांमध्ये मानदेशी फाउंडेशनच्या चेतना गाला सिन्हा, सामाजिक कार्यकर्त्या सुनीता हळदेकर, बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविषयी जनजागृती करणाऱ्या मेघश्रय फाउंडेशनच्या सीमा सिंह आणि भारतीय स्त्री शक्ती आणि दृष्टि स्त्री अध्यायन प्रबोधन केंद्राच्या विश्वस्त श्रीमती गीता गुंडे यांचा समावेश होता.

# सायबर गुन्ह्यांबद्दल व्यापक प्रमाणात जनजागृती व्हावी

## मुंबई विद्यापीठात महिला दिनाच्या निमित्त आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शकांचे मत

मुंबई, दि.१२ मार्चः वाढत्या सायबर गुन्ह्यांबद्दल आणि फसवणूकींच्या विविध प्रकाराबद्दल सर्वांनी दक्ष राहणे गरजेचे असून याबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती होणे गरजेचे असल्याचे मत मुंबई विद्यापीठात महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शकांनी केले. महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ, इतिहास विभाग आणि आर. ए. पोदार महाविद्यालय, माटुंगा यांच्या संयुक्त विद्यमाने १० मार्च २०२५ रोजी मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील फिरोजशाह मेहता सभागृहात 'सायबर क्राईम अँड टू बुलिंग इन द हायर एज्युकेशन कॅम्पस अँड सोसायटीः अ सिरिअस इश्यू अँड इट्स प्रिव्हेन्शन' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून डॉ. विभुती पटेल, माजी संचालक, महिला अध्ययन विभाग, टी.आय.एस.एस. यांनी POSH आणि POCSO अनुषंगाने तपशीलवार माहिती दिली. दुसऱ्या सत्रात डिपार्टमेंट ऑफ टेलिकम्युनिकेशन मुंबईचे असिस्टंट डिरेक्टर जनरल सत्यम सिंग यांनी विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांवर प्रकाश टाकला. विविध प्रकारचे गुन्हे आणि फसवणूकींच्या प्रतिबंधासाठी दूरसंचार विभागाने पुढाकार घेउन "संचारसाथी" ॲप तयार केले असल्याचे सांगितले. तसेच ॲप वापरण्याची प्रक्रिया सादरीकरणातून समजावून सांगितली.

महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठाच्या अध्यक्षा प्रा. उवर्शी मनुप्रसाद पंड्या यांनी महिला विकास कक्षाबद्दलची भूमिका विशद केली. तर इतिहास विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मी साळवी यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील पूर्वभुमिका मांडली. डॉ. तेजश्री पाटणकर, अध्यक्षा, महाविद्यालयीन महिला विकास कक्ष, आर.ए. पोदार महाविद्यालय यांनी मागील ३ वर्षांत महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात आलेल्या कार्यक्रमांचे अहवाल सादर केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन माजी अधिसभा सदस्य आणि महिला विकास कक्षाच्या सदस्य डॉ. सुप्रिया कारंडे यांनी केले.

# ‘एक मानवी कुटुंब: सर्वसमावेशकता, विकास आणि शांती यावर संवाद’ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

## इटली, फिलिपाईन्स आणि सिंगापूरसह विविध देशांतील प्रतिनिधींची उपस्थिती




आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेले मान्यवर

मुंबई, १२ मार्च २०२५: परिवर्तन अनुभवत असलेल्या आणि सतत बहुसांस्कृतिक आणि बहुधार्मिक बनत असलेल्या जगात, शांततेच्या संस्कृतीत अंतर्निहित मानवी मूल्ये, दृष्टिकोन आणि वर्तन यांना समर्थन देणारे शिक्षण देण्याची अत्यावश्यक आवश्यकता आहे. संघर्ष प्रतिबंधक तसेच संवादाद्वारे निराकरण, शाश्वत आर्थिक आणि सामाजिक विकासाची खात्री देणे, सर्व स्तरांवर मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेचा आदर करणे, लिंग समानतेचे समर्थन करणे, शांततेच्या संस्कृतीच्या समाजांमध्ये संवादाला पाठिंबा देऊन सांस्कृतिक विविधतेचा आणि मानवी एकतेचा आदर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे विचार या आंतरराष्ट्रीय परिषदेत मान्यवरांनी मांडले. मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभाग, अल्केश दिनेश मोदी इन्स्टिट्यूट फॉर फायनान्शियल अँड मॅनेजमेंट स्टडीज आणि मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी (स्वायत्त) आणि संस्कृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘एक मानवी कुटुंब: संवाद’ या विषयावर चर्चा करण्यासाठी ७ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. यामध्ये न्यू ह्युमॅनिटी - एनजीओ, इन जनरल कन्सल्टेटिव्ह स्टेटस इन द युनायटेड नेशन्स आणि शांती आश्रम (एनजीओ), कोइम्बतूर, भारत यांचा सहभाग होता.

शतकानुशतके सहअस्तित्व आणि संवाद जोपासण्यात भारताची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. ‘वसुधैव कुटुंबकम’ म्हणजे ‘जग हे एक कुटुंब आहे’ या भारतीय तत्त्वज्ञानाचा दाखला देत जीवनाचे मूल्य (मानव, प्राणी, वनस्पती तसेच सूक्ष्मजीव) सर्व तितकेच महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या संचालक प्रा. कविता लघाटे यांनी परिषदेचे उद्घाटन करताना केले. तर, सर्व धर्मांचा आदर करणे हे विश्व शांतीसाठी आवश्यक आहे, असे आर्चबिशप फेलिक्स मचाडो यांनी सांगितले. तसेच भारतीय ज्ञान प्रणालीच्या समावेशक दृष्टिकोनाने शांतता प्रस्थापित करण्याची शक्यता विस्तृत करून, सर्वसमावेशकतेचा प्रभाव आणि सार्वत्रिक कल्याणाच्या महत्त्वावर भर दिला.

### आंतरराष्ट्रीय परिषदेची प्रमुख उद्दिष्ट्ये:

- जगात शांतता प्रस्थापित करण्यात संवादाची भूमिका समजून घेणे
- आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून संवादाच्या आयामांवर लक्ष केंद्रित करणे
- विशेषतः मानवी मूल्यांच्या दृष्टिकोनातून धर्मांच्या चिंतनशील आयामांवर चर्चा करणे

- सर्वसमावेशकतेचे आयाम समजून घेणे आणि जगात त्याचे महत्त्व समजून घेणे
- समग्र विकासाच्या आयामांवर चिंतन आणि त्याचे महत्त्व सांगणे

या परिषदेत विविध सत्रांमधून आर्थिक, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंमधून सर्वसमावेशकता, सामाजिक न्याय आणि शांतता यांचे तात्विक अधिष्ठान यावर विचार करण्यात आला. मिताली आणि राऊल डिसोझा यांच्या नृत्यातून सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे याच विचारधारेचे सुंदर सादरीकरण करण्यात आले. या परिषदेत भारताच्या विविध राज्यातून तसेच इटली, फिलिपाईन्स, सिंगापूर आणि अन्य देशातून प्रतिनिधी उपस्थित होते. तत्त्वज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. प्रिया वैद्य, अल्केश दिनेश मोदी व्यवस्थापन विभागाच्या प्रा. स्मिता शुक्ला, संस्कृत विभाग प्रमुख डॉ. सुचित्रा ताजने आणि मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्थेच्या संचालक प्रा. मनीषा करणे, तसेच शांती आश्रमचे प्रमुख केझेविनो आरम आणि न्यू ह्युमॅनिटी (एनजीओ) च्या एडेलवीस कुदरोस यांनी या परिषदेचे यशस्वी आयोजन केले.

## आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाची सुवर्ण कामगिरी

### मुलभूत शास्त्रे आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास गटात प्रथम क्रमांक पटकावून दोन सुवर्ण पदकांची कमाई



आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी करणारी मुंबई विद्यापीठाची चमू

मुंबई, दि. ११ मार्च: भारतीय विद्यापीठ संघाच्या वतीने (एआययु) आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन महोत्सवात मुंबई विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रात सुवर्ण कामगिरी केली आहे. मुलभूत शास्त्रे आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास गटात प्रथम क्रमांक पटकावून दोन सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. चित्कारा विद्यापीठ पंजाब येथे १० आणि ११ मार्च २०२५ या दोन दिवसात या संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील ८२ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील १२ विद्यापीठांचे संशोधन प्रकल्प या संशोधन महोत्सवात निवडले गेले होते. मुलभूत शास्त्रे गटात अक्षय परब आणि वैभव कदम यांनी ‘प्लाजमा एनरहान्स लेझर एब्लेशन सिस्टम फॉर थर्ड- नायट्राईड ग्रोथ एट लो टेम्परेचर’ हा प्रकल्प सादर केला. तर आंतरविद्याशाखीय संशोधन गटात तनिशा गौर, यथार्थ वझीर, अक्षित सावलिया आणि यशकुमार दुबे यांनी ‘इशारा- अ गेश्चर ऑफ कम्युनिकेशन’

हा प्रकल्प सादर केला. या दोन्ही प्रकल्पांनी स्पर्धेत प्रथम स्थान पटकावले.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांमधील नवकल्पकता, वैज्ञानिक दृष्टिकोन ओळखून त्यांना संधीची उपलब्धता करून देणे, विद्यार्थ्यांसह शिक्षकांमधील संशोधनवृत्तीला बळ देऊन राज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अधिकाधिक सहभागिता वाढविणे अशा महत्वाकांक्षी उद्देश्यांसह विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ही स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये आयोजित केली जाते. प्राथमिक फेरीचे आयोजन एकूण पाच क्षेत्रस्तरावर केले जाते. प्रत्येक क्षेत्रातून विविध सहा विभागाच्या गुणाक्रमे प्रथम तीन संशोधन प्रकल्पांना अंतिम फेरीसाठी आंतरराष्ट्रीय संशोधन महोत्सवासाठी निवडले जाते. पश्चिम विभागीय क्षेत्रातून मुंबई विद्यापीठाचे चार प्रकल्प सादरीकरणासाठी पात्र ठरले होते. त्यातील दोन मुलभूत शास्त्रे आणि आंतरविद्याशाखीय संशोधन गटात विद्यापीठास मोठे यश मिळाले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. प्रसाद कारंडे यांनी विजयी चमूचे अभिनंदन करून भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने या स्पर्धेचे उत्तम नियोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या यशस्वी नियोजनसाठी विशेषज्ज्ञ म्हणून डॉ. शशिकुमार मेनन, प्रा. सुनिता शैलेजन, डॉ. मिनाक्षी गुरव, डॉ. भूषण लांगी, डॉ. रुपा राव, डॉ. मनिष देशमुख, डॉ. वैशाली निरमळकर, प्रज्ञा कोरलेकर, डॉ. दिलीप मोटवानी, डॉ. रसिका पवार, डॉ. ललिता मुतरेजा, डॉ. नैना साळवे आणि डॉ. सुरेखा शेट्टी यांनी काम पाहिले. तर विशेष कार्य अधिकारी म्हणून डॉ. मिनाक्षी गुरव आणि समन्वयक म्हणून डॉ. भूषण लांगी आणि चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. मनिष देशमुख आणि डॉ. ललिता मुतरेजा यांनी काम पाहिले.

"राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या संशोधन महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या चमूने केलेल्या सुवर्ण कामगिरीमुळे मुंबई विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. आविष्कार आणि अन्वेषण संशोधन महोत्सवातून पुढे येणाऱ्या प्रतिभावंताच्या संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी, मदत व अर्थसहाय्य करण्यासाठी विद्यापीठाने पाऊले उचलले असून इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या या प्रकल्पांना मूर्त रुप दिले जात आहे."

- **प्रा. रवींद्र कुलकर्णी,** कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

# मॉस्को राज्य विद्यापीठाच्या सहकार्याने शंकरराव चव्हाण शिक्षक प्रशिक्षण अकादमीच्या इमारतीत उभारली जातेय अत्याधुनिक सुविधा

मुंबई, दि. १० मार्चः मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील शंकरराव चव्हाण शिक्षक प्रशिक्षण अकादमी इमारतीत अत्याधुनिक ई-कंटेंट स्टुडिओ आणि स्मार्ट क्लासरूमची उभारणी केली जात आहे. मॉस्को राज्य विद्यापीठाच्या सहकार्याने ही अत्याधुनिक सुविधा कार्यान्वित केली जात आहे. मॉस्को, रशिया येथील आर्ट-पॉडगोटोव्हका या स्वायत्त बिगर-व्यावसायिक संस्थेने या सुविधेच्या निर्मितीसाठी रुपये ३५ लाखाचे अनुदान मंजूर केले आहे. ई-कंटेंट स्टुडिओ आणि स्मार्ट क्लासरूमच्या मदतीने शिक्षक प्रशिक्षणामध्ये आमुलाग्र बदल घडवणे आणि विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आशय वृद्धीसाठी याचा मोठा फायदा होणार आहे.

ई-कंटेंट स्टुडिओ: उच्च-गुणवत्तेच्या डिजिटल शैक्षणिक संसाधनांच्या निर्मितीसाठी प्रगत तंत्रज्ञानाने सुसज्ज असे हे ई-कंटेंट स्डुडिओ असेल.

स्मार्ट क्लासरूम: परस्परसंवादी डिस्प्ले, मल्टिमीडिया क्षमता आणि आकर्षक आणि सहयोगी शिक्षण वातावरण तयार करण्यासाठी ही क्लासरुम असेल.

मुंबई विद्यापीठ आणि मॉस्को राज्य विद्यापीठाचे हे सहकार्य उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याच्या बाबींवर भर देते. या अत्याधुनिक सुविधेमुळे शिक्षकांना नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती विकसित करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शिक्षण साधनांची ओळख होण्यास तथा या क्षेत्रात अधिक सक्षम करण्यास मोठा हातभार लागणार आहे. मॉस्को राज्य विद्यापीठासोबतची मुंबई विद्यापीठाची भागीदारी ही विद्यापीठातील शैक्षणिक पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि सक्षमीकरणाच्या दृष्टिने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ई-कंटेंट स्टुडिओ आणि स्मार्ट क्लासरूमच्या मदतीने शिक्षक प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यात आणि विद्यार्थ्यांना डिजिटल युगासाठी तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील असा आशावाद मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केला. मॉस्को राज्य विद्यापीठ ही रशियामधील उच्च शिक्षणाची एक अग्रगण्य संस्था असून ती तिच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी आणि संशोधन आणि विकासातील योगदानासाठी प्रसिद्ध आहे.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत मुंबई विद्यापीठ महिला खो खो संघाची उत्कृष्ट कामगिरी



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या चमूचे अभिनंदन करतानाचे क्षणचित्र

मुंबई, ०९ मार्च: २२ ते २५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान कालिकत विद्यापीठ कालिकत येथे झालेल्या अखिलभारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या स्पर्धेत देशभरातील १६ विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठ महिला खो खो संघाने साखळी सामन्यात मंगलोर विद्यापीठाचा १ गडी आणि १ पाळी राखून पराभव केला. तसेच हेमचंद यादव विश्व विद्यालय दुर्ग या संघाचा १ डाव ३ गुणांनी पराभव केला. पंजाबी विद्यापीठ चंदीगड या संघाचा १२ गुणांनी पराभव करून उप उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला. उप उपांत्य फेरीच्या सामन्यात केआयटी विद्यापीठ भुवनेश्वर या संघाचा १ गुण आणि १ पाळी राखून पराभव केला. उपांत्य फेरी मुंबई विद्यापीठ व कालिकत विद्यापीठ यामध्ये झाली. यामध्ये अतितटीच्या लढतीत मुंबई विद्यापीठास तृतीय स्थान मिळाले.

मुंबई विद्यापीठाच्या या संघामध्ये गीतांजली नरसाळे,साक्षी तोरणे,पूजा फरगडे,किशोरी मोकाशी, अपर्णा खंडागळे, सानवी तळवडेकर, दिव्या गायकवाड, रोशनी जूनगरे,श्वेता जाधव,पायल पवार,श्रिया नाईक, श्रेया सनगरे,काजल शेख,कल्याणी कंक या खेळाडूंचा सहभाग होता. संघाला मनोज पवार, रोहिणी डोंबे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. महिला खो खो संघाने स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी या चमूचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

# मुंबई विद्यापीठाचा आंतरराष्ट्रीय ठसा...

## इटलीत होत असलेल्या ७७ व्या लोकनृत्य महोत्सवासाठी मुंबई विद्यापीठाची निवड



इटलीतील ७७ व्या लोकनृत्य महोत्सवासात शोभायात्रा काढून उपस्थितांची मने जिंकणारी मुंबई विद्यापीठाची चमू

मुंबई, दि. ०९ मार्चः राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर सांस्कृतिक युवा महोत्सवात नावलौकीक कमावलेल्या मुंबई विद्यापीठाच्या चमूला आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकनृत्य सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. इटलीतील एग्रीजेंटो येथे होत असलेल्या ७७व्या लोकनृत्य महोत्सवासाठी मुंबई विद्यापीठाची निवड करण्यात आली आहे. या महोत्सवात जगभरातील निवडक २९ देशांची निवड करण्यात आली असून मुंबई विद्यापीठ भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. आज इटली येथे या महोत्सवाला सुरुवात झाली असून मुंबई विद्यापीठाच्या चमूने पारंपारिक लोकनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या आंतरराष्ट्रीय महोत्सवात मुंबई विद्यापीठाची चमू 'दिवळी' हे लोकनृत्य सादर करणार आहे. दिवळी हे लोकनृत्य दिव्यांचे नृत्य म्हणून ओळखले जाते. नर्तक त्यांच्या डोक्यावर जड पितळेचे दिवे जळत असताना नृत्य करतात. हा नृत्याविष्कार कलाकारांच्या कलात्मकतेचा आणि शिस्तीचा नमुना आहे. दिवे पूर्णपणे संतुलित राहतील याची खात्री करून नर्तक मोजलेल्या पावलांनी हलतात. पारंपारिक गोव्याच्या लोकगीतांच्या तालांशी समक्रमीत केलेला उत्कृष्ट देखावा समजला जातो.

९ ते १५ मार्च २०२५ दरम्यान इटलीतील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या एग्रीजेंटो महापालिका शहरात विविध ठिकाणी या लोकनृत्याचे सादरीकरण केले जाणार आहे. भारतीय विद्यापीठे संघाच्या (एआययु) निमंत्रणावरून मुंबई विद्यापीठाच्या चमूला इटली येथील सांस्कृतिक महोत्सवात सादरीकरणासाठी आमंत्रित केले आहे. या चमूमध्ये १० विद्यार्थी, संघ व्यवस्थापक, नृत्य दिग्दर्शक, सहाय्यक आणि सांस्कृतिक समन्वयक यांचा समावेश आहे.

# ३८ व्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची उत्कृष्ट कामगिरी

## ८ सुवर्ण पदकांसह ३ रौप्य आणि १ कांस्य पदकांची कमाई करत मिळवला उपविजेतेपदाचा बहुमान




३८ व्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठीय युवा महोत्सवामध्ये दर्जेदार कामगिरी करणारी मुंबई विद्यापीठाची चमू

मुंबई, दि. ०७ मार्चः ३८ व्या राष्ट्रीय आंतर विद्यापीठीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ८ सुवर्ण पदके, ३ रौप्य आणि १ कांस्य पदकांची कमाई करत मुंबई विद्यापीठास उपविजेतेपदाचा बहुमान मिळाला आहे. या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने एकूण ८६ गुणांची कमाई केली आहे. भारतीय विद्यापीठे संघ (एआययु) यांच्या निर्देशानुसार ०३ मार्च ते ०७ मार्च २०२५ या दरम्यान अमिटी विद्यापीठ, नोएडा येथे या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात देशातील १४८ विद्यापीठे सहभागी झाली होती.

संगीत, नाट्य, नृत्य, साहित्य आणि ललितकला या पाच विभागात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये मुंबई विद्यापीठाने संगीत विभागातून भारतीय सुगम संगीत गायन, भारतीय शास्त्रीय गायन, भारतीय शास्त्रीय तालवाद्य, पाश्चिमात्य वाद्य एकल वादन या स्पर्धांमध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. तर पाश्चिमात्य समुह गायन व पाश्चिमात्य एकल गायन या स्पर्धांमध्ये रौप्य पदक आणि भारतीय समुह गायन स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त केले आहे. नाट्य विभागातील प्रहसन स्पर्धेत रौप्य पदक जिंकले आहे. साहित्य विभागातील वादविवाद स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले आहे. तसेच ललित कला विभागातील झालेल्या स्पर्धांमध्ये रांगोळी आणि व्यंगचित्र स्पर्धेतही सुवर्ण पदक जिंकले आहेत. विशेष म्हणजे सहभागी १४८ विद्यापीठांनी सादर केलेल्या शोभायात्रा स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास सुवर्ण पदकाचा बहुमान मिळाला आहे. संगीत या विभागामध्ये सर्वात जास्त गुणांची कमाई करून मुंबई विद्यापीठाने संगीत विभागातील अंतिम सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले आहे.

हा राष्ट्रीय महोत्सव दोन फेऱ्यांमध्ये आयोजित केला जातो. स्पर्धेची प्राथमिक फेरी संपूर्ण देशात सात क्षेत्रीय विभागात आयोजित केली जाते. या प्रत्येक क्षेत्रीय विभागातील प्रत्येक स्पर्धेच्या प्रथम, द्वीतीय आणि तृतीय पारितोषिक विजेत्यांना अंतिम फेरीत सहभागी होता येता येते. ०४ ते ०८ जानेवारी २०२५ दरम्यान गणपत विद्यापीठ, महेसाना, गुजरात येथे आयोजित केलेल्या प्राथमिक फेरीमध्ये पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठास १२ पदकांची कमाई

करत या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभाग घेतला. मुंबई विद्यापीठाच्या चमूने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी विजयी चमूचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे यशस्वी नियोजन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील आणि सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांनी केले.

## मुंबई विद्यापीठाकडून सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

### २२ एप्रिल पर्यंत करता येणार ऑनलाईन अर्ज

### उत्कृष्टक्षम प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा मुंबई विद्यापीठाकडून होणार गौरव

### विद्यापीठ विभाग आणि संलग्नित महाविद्यालयीत प्रत्येकी तीन मुले आणि तीन मुलींची होणार निवड

मुंबई, दि. ०६ मार्चः मुंबई विद्यापीठाकडून प्रथमच उत्कृष्टक्षम प्रतिभावंत विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी विद्यापीठ विकास विभागाच्या वतीने दिनांक २२ एप्रिल २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले असून, या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठ विभागांसाठी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. १५ मार्च २०२५ पासून विद्यार्थी विकास विभागाच्या https://unimumbaidsd.com/ या संकेतस्थळावर जाऊन विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. ऑनलाईन सादर करावयाचा अर्ज, आवश्यक कागदपत्रे, छाननी आणि निवड प्रक्रिया या सर्वांचा तपशील परिपत्रकात नमूद करण्यात आला आहे. ऑनलाईन भरलेला अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह हार्ड कॉपीमध्ये विद्यार्थी विकास विभागाकडे सादर करणे बंधनकारक असणार आहे.

सर्वसमावेशक विद्यार्थी केंद्रीत विद्यार्थ्यांचे हित जोपासत मुंबई विद्यापीठामार्फत या शैक्षणिक वर्षापासून सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागात आणि संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये शिकत असलेल्या प्रत्येकी तीन मुले आणि तीन मुलींना सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारांने सन्मानित केले जाणार आहे. शैक्षणिक उत्कृष्टक्षम प्रतिभावंतांना प्लॅटिनम, डायमंड आणि गोल्डन बॉय्स आणि गोल्डन गर्ल्स अशा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यामध्ये प्लॅटिनम पुरस्कारासाठी रुपये १५ हजार सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, डायमंड पुरस्कारासाठी रुपये १२ हजार सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र आणि गोल्डन पुरस्कारासाठी रुपये १० हजार सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्राचा समावेश आहे.

सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराच्या निवडीचे निकषः

Ø विद्यार्थी हा शेवटच्या सत्रासाठी प्रविष्ठ असावा

Ø आधीच्या सत्रांमधील उपस्थिती ही सर्वसाधारण

७५ टक्के पेक्षा जास्त असावी

Ø पूर्वीच्या सत्रातील सर्व विषयात आणि पेपर्समध्ये पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असावा

Ø विद्यार्थ्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कारवाई झालेली नसावी

या पात्रतेच्या निकषांव्यतिरिक्त पूर्वीच्या सत्रातील शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार असून त्यासाठी गुणांकन दिले जाणार आहे. आंतरविद्यापीठ आणि राष्ट्रीय स्तरावरील संशोधन कार्याच्या सादरीकरणासाठीचे गुण, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन प्रकाशनांसाठीचे गुण, पेटंट, विभागस्तरावर आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठीचे योगदान, क्रीडा क्षेत्रातील आंतरमहाविद्यालयीन, क्षेत्रनिहाय, राज्यस्तरीय, आंतरविद्यापीठीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धातील खेळ प्रकारातील योगदान, राष्ट्रीय सेवा योजनेतील १२० तासांचे उपक्रम, ७ दिवसांच्या निवासी शिबिरातील सहभाग, विद्यापीठ स्तर- राज्यस्तरावरील आव्हान आणि उत्कर्ष शिबिरातील सहभाग, प्रजासत्ताक दिनानिमित्त परेडमध्ये सहभाग, एनसीसीतील सहभाग, युवा महोत्सवातील क्षेत्रीय, अंतिम, इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय आणि राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवातील सहभाग, आविष्कार संशोधन महोत्सवातील क्षेत्रीय, अंतिम, राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय आणि राष्ट्रीय स्तरावरील आंतरविद्यापीठीय अन्वेषण संशोधन स्पर्धेतील योगदान, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागासाठीच्या १२० तासांचे उपक्रम, उडान महोत्सव यासह ज्ञानस्त्रोत केंद्रात १ तासाच्या कमीतकमी ३० भेटी अशा विविध काटेकोर निकषांवरून सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कारांसाठी विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

निर्मिती आणि संपादन:
**जनसंपर्क विभाग**
मुंबई विद्यापीठ

पत्ता:
**मुंबई विद्यापीठ**
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००३२

प्रकाशक:
**डॉ. प्रसाद कारंडे**
कुलसचिव

info@mu.ac.in www.mu.ac.in @Uni_Mumbai